पनवेल(प्रतिनिधी) पनवेल शहरासह तालुक्यातील सिडको हद्दीत समाविष्ट असलेल्या नविन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली, खारघर या वसाहतींमधील विविध नागरी समस्यांची लवकरात लवकर सोडवणूक करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे केली होती. यासंदर्भात उपाययोजना आखण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.२७) बेलापूर येथील सिडको भवनात सर्व विभागातील सिडको अधिकाऱ्यांसोबत झालेल्या संयुक्त बैठकीत सकारात्मक चर्चा पार पडली.

सिडको भवनात झालेल्या या महत्वपूर्ण बैठकीत पनवेलच्या नगराध्यक्षा चारूशिला घरत, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, नगरसेवक प्रकाश विनेदार, मनोहर म्हात्रे, गणेश पाटील, गणपत म्हात्रे, रायगड जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, रोडपाली सरपंच अरूण पाटील, तळोजा जिल्हा परिषद कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, कामोठे कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुधाकर पाटील, कामोठे ग्रामपंचायत सदस्य प्रदीप भगत, विनोद गोवारी, मालती गोवारी, जयश्री गोवारी, पनवेल तालुका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमर पाटील, कळंबोली कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अशोक मोटे, यशवंत ठाकूर, युवा नेते वीर सिंग, सुभाष गायकवाड, किर्ती नवघरे आदी मान्यवर तर सिडकोच्यावतीने मुख्य अभियंता संजय चौधरी, श्री.वरखेडकर, सुरेश बाबू, अतिरिक्त मुख्य अभियंता एस.के.चौतलिया, उप नियोजन अधिकारी शुभांगी काळे, सहाय्यक नियोजन अधिकारी प्रियदर्शन वाघमारे, पनवेलचे कार्यकारी अभियंता संजय कराड, कळंबोली कार्यकारी अभियंता के.ओ.चौधरी, खारघरचे कार्यकारी अभियंता श्रीकांत गोसावी यांनी चर्चेत सहभाग घेतला.

या बैठकीत पनवेल नगर परिषदेच्यावतीने सुरू होत असलेल्या परिवहन सेवेसाठी प्रत्येक नोडमध्ये स्वतंत्र बस डेपोसाठी जागा मिळावी या प्रमुख मागणीसह सिडको हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसन, आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा, डंम्पिंग ग्राऊंड, खेळाचे मैदान, बगीचे, तरण तलाव, विरंगुळा केंद्र, विसर्जन घाट, स्मशानभुमी, होल्डींग पॉड, वाचनालय, ग्रंथालय, शौचालय, जोड रस्ते, अनधिकृत ट्रक पार्किंग, नाले बंदिस्ती, पथदिवे, समाजमंदिर, स्टिल मार्केट दुरूस्ती, ड्रेनेज आणि सिव्हरेज, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मटन व मासळी मार्केट, रोज बाजार, स्वच्छता, गतीरोधक आदी महत्वाच्या समस्यांवर विभागवार विस्तृत चर्चा करण्यात आली. बस डेपो, विरंगुळा केंद्र, खेळाचे मैदाने, सामाजिक संस्थांसाठी आरक्षित प्लॉट या संदर्भात प्रस्ताव देवून लवकरात लवकर हे प्रश्न मार्गी लावण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली. विभागीय कार्यालयांच्या अखत्यारित येत असलेली व निकड असलेली कामे तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.

कळंबोली परिसरातील नगारिकांना भेडसावत असलेली अनधिकृत ट्रक पार्किंग, आंबेडकर भवन, समाजमंदिर आणि विरंगुळा केंद्र यासाठी सात दिवसात निविदा काढण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे स्टिल मार्केटची दुरूस्ती, बीयुडीपी क्षेत्रात नवीन बांधकामांसाठी परवानगी देणे, रोज बाजार, धार्मिक संस्थांसाठी भूखंड, पिण्याच्या पाण्याची वाहिनी, सेक्टर १२ मध्ये आरोग्य केंद्र या विषयांसंदर्भात तर नविन पनवेल हद्दीतील खांदा कॉलनीमध्ये खेळासाठी क्रिडांगणासाठी प्रामुख्याने आवश्यकता असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर लवकरात लवकर रिकामे जागेवर क्रिडांगण विकसीत करून देण्याचे आश्वासन सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिले. तसेच स्मशानभुमी व दफनभूमीसाठी रस्ता व संरक्षण भिंत संदर्भातही दहा दिवसात निर्णय घेण्यात येणार आहे. नविन पनवेल व खांदा कॉलनीत ठिकठिकाणी रिलायन्स कंपनीने तसेच एमटीएनएल व वीज पुरवठा विभागाकडून केबलच्या कामासाठी खणणेले खडडे बुजविलेले नाहीत, यासाठी संबंधितांवर कारवाई करण्याचे अधिकाऱ्यांनी कबूल केले. खारघर विभागात आरोग्य केंद्र, बस डेपो, विरंगुळा केंद्र, वाचनालय, ग्रंथालय, शौचालय या मागण्यांबरोबरच महामार्ग व रेल्वे स्थानकाला जोडणारा स्कायवॉक सेक्टर ०२ पर्यंत विस्तारित करावा तसेच मोठया नाल्यांची बंदिस्ती करावी ही प्रमुख मागणी नमूद करण्यात आली. त्याचबरोबर खारघरमध्ये सुसज्ज तरण तलाव व इनडोअर स्पोर्टस क्लब निर्माण करावेत, धामोळे आदिवासीवाडीचे पुनर्वसन लवकरात लवकर करावे, कामोठे परिसरातील सेक्टर २१/११ येथे समाजमंदिर, विरंगुळा केंद्र, क्रिडांगण, गावठाण परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, व्यायामशाळा यांसह बस डेपो व्हावा, अशा मागण्यांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. यावर लहान स्वरूपाची कामे येत्या सात दिवसात पूर्ण करण्यात येणार असून काही कामांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. क्रिडांगण, समाजमंदिर यांसारख्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी त्या-त्या परिसराचा सर्व्हे करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.